MHRG160000922019

नियमित दिवाणी दावा क्र. १४/२०१९

निशाणी क्र. २५ वरील आदेश

( पारित दि.२४/०७/२०२३)

वादीने प्रतिवादी क्र. ०२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ०२ श्रीमती वनिता वसंत जाधव हया दि. १५/०५/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना दोन मुले असे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र. ०२ यांचे वारस प्रतिवादीपणात सामिल करुन घ्यावेत अशी वादींची मागणी आहे.

०२. प्रतिवादी क्र. ०१ याने वादीच्या अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदवली आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वारस पुर्ततेबाबत विलंब झाला आहे. तसेच वारस दुरुस्तीचा अर्ज कायदेशीर नाही.

०३. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जास प्रतिज्ञापत्रद्वारे आधार दिला जातो. अर्जाच्या पुष्टयर्थ सुहास पवार याने प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. मृत्युच्या दाखल्याची प्रत नि. क्र. २८ लगत दाखल केलेली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ०२ श्रीमती वनिता वसंत जाधव हया दि. १५/०५/२०२० रोजी मयत झाल्याचे अभिलेखावर दिसून येते. वास्तविक ९० दिवसांच्या आत अर्ज दाखल करावा लागतो. निश्चितच अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. परंतु सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने दाव्याचा निकाल गुणदोषावर होणे आवश्यक आहे. तसेच दाव्याच्या सरनाम्यातील प्रतिवादी क्र. ०२ चे नाव कमी करुन त्यांच्या वारसांना प्रतिवादीपणात सामिल करुन घेणे

आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे मी आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज नि. क्र. २५ मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादीला प्रतिवादी क्र. ०२ चे नाव कमी करुन कायदेशीर वारस नोंदवण्याची परवानगी आहे.

०३. वादीने प्रस्तुत दाव्यात १४ दिवसांच्या आत दुरुस्ती करावी आणि दुरुस्ती दाव्याची प्रत विलंब न लावता दाखल करावी.

MEENA WAMAN JADHAV

Digitally signed by MEENA WAMAN JADHAV
Date: 2023.07.28 17:40:30 +0530

**ठिकाणः पाली** **(मिना वामन जाधव)**

**दिनांक : २४/०७/२०२३** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाली.**